# योहानाचे दुसरे पत्र

2 John | with Study Notes

# योहानाचे दुसरे पत्र

# 1

[1] मी जो प्राचीन*, त्याकडून निवडलेली* श्रीमती* (बाई) व तिच्या मुलांच्या नांवे, ज्यांच्यावर मी खरेखुरे प्रेम* करतो. केवळ मीच
नव्हे, पण ते देखील ज्यांनी सत्य* ओळखलेले आहे. [2] असे सत्य, जे आपल्याठायी वसते* आणि नेहमी* आपल्याबरोबर राहील;
[3] *त्यामुळेच परमेश्वराचा पुत्र* प्रभु येशू ख्रिस्त यांची, कृपा, करूणा व शांति*, प्रेमासह सदैव तुमच्याबरोबर राहतील. [4] मला
याविषयी आनंद* आहे, की मी तुमची काही मुलें त्या आज्ञेनुसार* जी आपल्याला पिता परमेश्वरापासून मिळालेली होती, सत्यावर
चालत* असलेली पाहिली. [5] *आता हे बाई, मी तुला विनंती करून कोणतीही नवीन आज्ञा नव्हे, केवळ तीच जी प्रारंभापासून

---

* **1:1** *"प्राचीन"*- योहान स्वतःला 'प्रेषित' असे म्हणत नाही (जरी शंकाच नाही की तो एक प्रेषितच होता). इतर लोक प्रेषितांना 'प्राचीन' म्हणत असत आणि कधी कधी त्यांना वडील म्हणत असत (1 पेत्र 5:1). या विशिष्ट शब्दाद्वारे , परिपक्व वर्षाचा अनुभव आणि जे त्यांचे चर्चकरता पुढारीपण होते या दोन्हींचा त्याकडे निर्देश होतो.

* *"निवडलेली"*- ग्रीक शब्दाचा अर्थ 'ज्यांना निवडण्यात आले' असाही होतो (मत्त 24:22,24,31; रोम 8:33; इफि 1:4; कल 3:12; 1 पेत्र 1:1; 2:9).

* *"श्रीमती"*- ग्रीक शब्द 'करिया' असा वापरलेला आहे आणि ते एक सामान्य वैयक्तिक नांव होते. यावरून स्पष्ट कळते की योहान अशा एका श्रीमतीला हे पत्र लिहितो आहे जी नांवाजलेली सात्विक विश्वासी (बाई) होती आणि तिची मुलें सुद्धा तिच्याप्रमाणेच विश्वासी होती.

* *"खरेखुरे प्रेम"*- योहानाचे प्रेम मानवी भावनेने भरलेले प्रेम नव्हते किंवा केवळ नैसर्गिक - स्वाभाविक - भावनात्मक प्रेम नव्हते, पण ते परमेश्वरी प्रेम होते (अगापे - नोट्स - 1 करिं 13:1). आणि या प्रेमाचा आधार नेहमी सत्यावर टेकलेला असतो.

* *"सत्य"*- अगदी तोच संदेश, तेच वचन जे ख्रिस्तांचे होते (योहान 1:17). विश्वासी एकमेकांवर प्रेम करतात कारण परमेश्वराने जे सत्य प्रगट केले त्याप्रत त्यांची एकमेकांकरता निष्ठा आहे, समर्पण आहे.

* **1:2** *"वसते"*- आपल्या मनात सत्याचा स्वीकार करण्याहून आणखी कितीतरी अधिक ख्रिस्तांचे विश्वासी करत असतात. ते आपल्या हृदयात ख्रिस्तांच्या सत्याचे स्वागत करतात आणि त्यामुळे ते सत्य त्यांच्याठायी असे राहते, की ते त्यांच्या एकंदर सर्व प्रकारच्या व्यवहारावर व वागणुकीवर प्रभाव टाकते. तुलना स्तो 51:6आणि ख्रिस्त जे स्वतःच 'सत्य' आहेत त्यांच्याठायी कायमचे वसतात (योहान 14:6).

* *"नेहमी"*- योहानाला असा दृढ विश्वास होता की जे परमेश्वरी सत्य विश्वासींच्या हृदयात संपूर्ण रीतिने रूजवून दिलेले आहे, पेरलेले आहे ते अनंतकाळापर्यंत तसेच रूजून राहील.

* **1:3** 1 तीम 1:2.

* *"परमेश्वराचा पुत्र"*- या गोष्टीकडे बारीक लक्ष द्या की योहान कशा प्रकारे पिता व ख्रिस्त यांच्यातील भेद (फरकाचे) वर्णन करतो. ख्रिस्त पिता नाही. पिता, ख्रिस्त नाही. अनंतकाळात त्यांचे दोन वेगळे-विशिष्ट व्यक्ती म्हणून अस्तित्व आहे. परमेश्वरत्वात ते दोन वैशिष्टयपूर्ण व्यक्ती आहेत. पाहा वचन 9. पाहा नोट्स - पिता, पुत्र व त्रिएकत्व - मत्त 3:16-17; 5:16; 28:19; योहान 3:16; 17:1.

* *"कृपा, करूणा व शांति"*- या त्रिसद्गुणांच्या साहाय्यानेच ख्रिस्ती जीवन व ख्रिस्तांची सेवा घडत असते, किंबहूना शक्य असते. कृपा ही परमेश्वराच्या हृदयातील झरा आहे; करूणा ही ती कृपा आहे जी ओतली जाते व शांति हा त्यांचा परिणाम होय.

* **1:4** *"आनंद"*- एखाद्या मनुष्याच्या चारित्र्यावरून आपल्याला कळू शकते, आपण शिकू शकतो की कशाद्वारे त्याला इतका विपुल आनंद मिळत असतो.

* *"आज्ञेनुसार"*- तुलना अनु 5:33; 10:12; 1 राजे 2:3; यश 30:21; यिर्म 6:16. 'पश्चात्ताप करा' ही परमेश्वराची आज्ञा आहे (प्रेषि 17:30), जेणेकरून सर्व वाईट कृत्यें, दुष्टाई, लबाडी, धोकेबाजी, ठकवणे, फसवणे सोडता यावे आणि सत्याच्या मार्गाने चालता यावे.

* *"सत्यावर चालत"*- परमेश्वराच्या सत्यावर विश्वास ठेवणे व त्याचा सराव व प्रात्यक्षिक म्हणून ते जीवनात लागू करणे हाच अर्थ आहे. तुलना योहान 8:31-32.

* **1:5** योहान 13:34.

आपल्याजवळ (ठायी) आहे, लिहितो आहे. ती ही की आपण एकमेकांवर प्रेम करावे. [6] [*]प्रेम हेच आहे, की आपण येशूंच्या
आज्ञेनुसार जीवन जगावे. ही तीच आज्ञा आहे जी तुम्ही सुरवातीपासून ऐकलेली आहे आणि जिच्याप्रमाणे तुम्ही चालावेही. [7] कारण
जगात मार्ग भुलवणारे[*] (फसवणारे) उठले आहेत. ते कबूल करत नाहीत, की येशू देह धारण करून[*] या पृथ्वीवर आले होते. हेच ते
फसवणारे (धोकेबाज) आणि ख्रिस्त विरोधक[*] आहेत. [8] स्वतःविषयी सावध असा, अशाकरता की आम्ही जे श्रम केलेले आहेत, ते
तुम्ही व्यर्थ व निष्फळ करु नये, परंतु हेच की तुम्हांला त्याचे पुरेपूर प्रतिफळ[*] मिळावे. [9] [*]जो कोणी ख्रिस्तांच्या शिक्षणापासून दूर
भटकून जातो आणि त्यात स्थिर राहत नाही, त्याच्याजवळ परमेश्वर नाही. जो ख्रिस्तांच्या शिक्षणात कायम टिकून राहतो,
त्याच्याजवळ पिता व पुत्र दोघेही[*] आहेत. [10] जर तुमच्या घरी येणारा[*] मनुष्य या प्रकारचे शिक्षण देत नसेल, तर आपल्या घरात
त्याचे स्वागत तर करू नकाच, पण त्याला सलाम देखील करू नका. [11] कारण जो कोणी अशा मनुष्यास सलाम करतो, तो त्याच्या
वाईट कृत्यांत[*] हातभार (भागीदार) लावतो. [12] मी तुम्हांला आणखी बरेच काही लिहू इच्छितो, पण कागदावर शाईने नव्हे. अशी
आशा बाळगतो, की मी समोरासमोर तुमच्याशी बोलावे, जेणेकरून तुमचा आनंद परिपूर्ण होऊन जावा. [13] तुझ्या निवडलेल्या
बहिणीची मुलें तुला सलाम सांगतात.

---

[*] **1:6** योहान 14:15,21,23.जे काही परमेश्वर करावयास सांगतो तसे न करणे, व्यर्थ विचार करणे ही फसवेगिरी होय.

[*] **1:7** *"मार्ग भुलवणारे"*- तुलना मत्त 24:4,24; रोम 16:18; 2 करिं 11:13-15.ही सर्व फसवेगिरीची व ठकवण्याची कृत्यें लबाड (खोटे) बोलणाऱ्यांच्या प्रमुखाकडून येतात (प्रकटी 12:9).

[*] *"देह धारण करून"*- योहान 1:14.ख्रिस्त मनुष्य झालेत, त्यांच्याठायी खरा मानवी स्वभाव होता (इब्री 2:14,17). खरे पाहता, तो मानवी स्वभाव त्यांच्यात अजूनही आहे, जे आता मेलेल्यातून जिवंत उठलेले, महिमामय प्रभु आहेत आणि जे पुन्हा येणार आहेत.

[*] *"ख्रिस्त विरोधक"*- 1 योहान 2:18,22; 4:3 -म्हणजे तो जो ख्रिस्तांचा शत्रु आहे जो ख्रिस्तांचे स्थान (पद) घेण्याचा प्रयत्न करतो. 1:8- खोटया शिक्षकांचे ऐकून आणि त्यांच्या प्रभावाचे शिकार होऊन, खरे विश्वासी आपला उद्धार गमावणार नाहीत; परंतु 'इतर सर्व काही' मात्र ते नक्कीच गमावतील (मुकतील). तुलना प्रकटी 3:11; 2 तीम 2:5; 1 करिं 9:27.

[*] **1:8** *"पुरेपूर प्रतिफळ"*- प्रकटी 22:12.

[*] **1:9** काही लोकांचा स्वतःविषयी असा विश्वास आहे की ते प्रगतीशील मोठे-महान ज्ञानी आहेत आणि म्हणून ते ख्रिस्तांचे सत्य मागे त्यागून, पुढे निघतात. असे लोक हेच उघड करतात की ते परमेश्वरावाचून आहेत. तुलना 1 योहान 2:19.'कायम टिकून' - योहान 8:32; 2 तीम 3:14.जे कोणी सत्यात टिकून राहतात, सत्याचे निरंतर अनुकरण करतात, त्यांच्या जीवनाद्वारे उघडउघड कळते की परमेश्वर त्यांच्याठायी आहे.

[*] *"दोघेही"*- वचन 3 - एकापेक्षा अधिक व्यक्तिंकडे केलेला संकेत आहे.

[*] **1:10** *"तुमच्या घरी येणारा"*- योहान अशा मनुष्यांविषयी बोलतो आहे जे, ख्रिस्तांच्या शिक्षणाव्यतिरिक्त आणखी वेगळे काही शिकवतात. आपल्या घरी आपण अशा लबाड शिक्षकांचे स्वागत करू नये, त्यांना घरात प्रवेश देऊ नये त्याच्याबरोबर कोठेही कशीही सहभागिता किंवा संगत करू नये. आपण त्यांचे अभिवादनही करता कामा नये (तुलना 2 करिं 6:15; रोम 16:17). जर आपण तसे केले तर, स्वतःला धोक्यात पाडतो आणि इतरांना असे समजवतो व भासू देतो, की त्यांचे शिक्षण, इतके काही वाईट नाहीये.

[*] **1:11** *"वाईट कृत्यांत"*- त्याच्या वाईट कृत्यांत हातभार लावणे (सामील) हीच ती शिकवण जी ख्रिस्तांच्या शिक्षणाविरूद्ध आहे. खरे पाहता, माणसांना शक्य असलेले जे काही आहे, त्यांपैकी सर्वात मोठे दुष्कृत्य हेच आहे. विश्वासींचा त्यात कोणताही वाटा नसावा किंवा त्यात कसलाही सहयोग नसावा किंवा कोणत्याही प्रकारे त्यांना मदत करावयाची वृत्ति नसावी 12 'आनंद' - हाच खऱ्या ख्रिस्ती सहभागितेचा आनंद होय जो सत्याठायी असतो. तुलना 1 योहान 1:4.